अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## शरद पवारांनी एकदा नाही तर दोनदा चूक केली : बच्चू कडू

**अमरावती** : अमरावती लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार बळवंत वानखेडे यांच्या प्रचारासाठी शरद पवार, उद्धव ठाकरे यांची आज अमरावतीत जाहीर सभा पार पडली.

या सभेत बोलताना शरद पवार यांनी अमरावतीच्या विद्यमान खासदार नवनीत राणा यांच्यावर टीका केली. तसेच आपली पाच वर्षांपूर्वी चूक झाली, पण आता ही चूक सुधारायची आहे, असे विधान करत शरद पवार यांनी नवनीत राणा यांच्यावर निशाणा साधला. अमरावतीत महाविकास आघाडीच्या सभेत शरद पवार यांनी केलेल्या या विधानावर प्रहारचे अध्यक्ष, आमदार बच्चू कडू यांनी प्रतिक्रिया दिली आहे. शरद पवार यांनी एकदा नाही तर दोनदा चूक केली, असे म्हणत बच्चू कडू यांनी नवनीत राणा यांच्यावर अप्रत्यक्ष निशाणा साधला. ते आज अमरावतीत माध्यमांशी बोलत होते. शरद पवार यांनी एकदा नाही तर दोनदा चूक केली. एवढी मोठी चूक केली की, ती चूक संपूर्ण अमरावतीकरांना भोगावी लागत आहे. एवढ्या मोठ्या माणसाने अशा चूका करु नये. अशा चुका झाल्या तर अडचण होते. मात्र, तरीही शरद पवार यांनी माफी मागण्याची गरज नव्हती. रवी राणा हे विधानसभेला राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसकडून पाठिंबा घेऊनच निवडून आले. कारण त्यांना पाठिंब्याशिवाय जमत नाही. आता रवी राणा यांचा पक्ष त्यांच्या पत्नीनेच फोडला, म्हणजे युवा स्वाभीमान पक्ष फुटला आणि त्या भाजपामध्ये गेल्या, असे म्हणत बच्चू कडू यांनी रवी राणा यांच्यावर टीका केली.



# संजय क्षीरसागरांचा भाजपला अखेर राम राम

## शरद पवार गटात उद्याच प्रवेश; मोहोळला जंगी कार्यक्रम
## समर्थकांचे मोठे शक्तीप्रदर्शन; राजकारणाची वेगळी गणिते

मोहोळ/सोलापूर/प्रतिनिधी

**भाजपचे नेते संजय क्षीरसागर यांनी अखेर ऐन लोकसभा निवडणुकीच्या रणधूमाळीत पक्षाला कायमचा राम राम ठोकला आहे. मोहोळ तालुक्यातील जनमताचा कौल घेऊन शरदचंद्र पवार गटाची तुतारी हातात घेण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. उद्या बुधवारीच या पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या खास उपस्थितीत त्यांचा पक्ष प्रवेश होणार आहे. या पार्श्वभूमीवर, मोहोळमध्ये जंगी कार्यक्रम घेऊन शरद पवार यांच्यापुढं मोठं शक्तीप्रदर्शन संजय क्षीरसागर यांच्याकडून केलं जाणार आहे. विशेषत्वे, संजय क्षीरसागर हे मोहोळ विधानसभेचे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार होऊ शकतात, तसा त्यांना शरद पवार यांनी शब्द दिल्याची माहिती शरद पवार यांच्या अत्यंत निकटवर्तीयांकडून 'सुराज्य' ला मिळाली आहे. क्षीरसागर यांच्या भाजप सोडण्यानं तालुक्याच्या राजकारणाची गणितं बदलणार आहेत.**

दरम्यान, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटात प्रवेश करण्याच्या पार्श्वभूमीवर, आज सोमवारी संजय क्षीरसागर यांनी मोहोळ येथे पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली.

क्षीरसागर म्हणाले, गेल्या दहा वर्षापासून भाजपमध्ये मला अपमानास्पद वागणूक मिळत आहे. या पक्षाच्या कठीण काळात मी काम केले. भाजपमधील जिल्ह्याच्या काही नेत्यांच्या दबावामुळे माझ्यावर कायम अन्याय केला जात आहे. त्यामुळेच मी भाजपला रामराम करून राष्ट्रवादी खा. शरद पवार गटात प्रवेश करणार असल्याचा गौप्यस्फोट भाजपाचे नेते संजय क्षीरसागर यांनी केला.

भाजप सोडण्यावर माहिती देताना क्षीरसागर म्हणाले की, पक्ष सोडण्यापूर्वी मी भाजपच्या वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करून त्यांच्याकडे मला कसा त्रास दिला गेला याचे पुरावे ही दिल्याचे त्यांनी सांगितले. ऐन निवडणुकीच्या काळात क्षीरसागर यांनी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतल्याने भाजपची सोलापूर लोकसभेच्या मतदार संघात अडचण होणार आहे. कारण त्यांच्यासोबत धनगर समाजाची मोठी व्होट बँक आहे. क्षीरसागर यांना धनगर समाज व्होट बँक पॉकेट समजलं जातं.

अधिक माहिती देताना क्षीरसागर म्हणाले, गेल्या २५ वर्षापासून जनतेने माझ्यावर प्रेम केले. परंतु, त्यांना मी काहीच देऊ शकलो नाही. त्यांच्या उपकाराची उतराई मी कशी करणार? भाजपने आजपर्यंत मला जनतेसाठी कुठलाच निधी दिला नाही. मला भाजपच्या वरिष्ठ नेत्यांना भेटण्यासाठी मुंबईत तीन-तीन दिवस मला अपॉइंमेंट मिळू दिली नाही.शेवटी तीन ते चार दिवस मुंबईत राहायचे व परत मोहोळला यायचे. माझा भाजपवर राग नाही, मात्र भाजपच्या ग्रामीण व्यवस्थेवर माझा राग आहे. मी याबाबत वरिष्ठाकडे अडचण सांगण्याचा बऱ्याच वेळा प्रयत्न केला. परंतु माझी दखल कुणीच गांभीर्याने घेतली नाही. मी गेल्या पंधरा दिवसांपासून मतदार संघातील १४० गावांचा दौरा केला व जनतेची मते जाणून घेतली. जनतेने मला राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटात जाण्याचा सल्ला दिला. पक्ष प्रवेशाबाबत खासदार शरद पवार, शिवसेनेचे खासदार संजय राऊत, यांच्याशी माझी चर्चा झाली. बैठकही झाली. मोहोळ विधान सभेची जागा कुणाच्या वाटेला जाणार या बाबत ही चर्चा झाली. मगच पक्षप्रवेशाचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले. उद्या दि. २४ ला मोहोळ येथे शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, रोहित पवार, विजयसिंह मोहिते पाटील, यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्ता मेळावा आयोजित केला आहे. त्या मेळाव्यातच मी प्रवेश करणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे ऐन निवडणुकीच्या काळात भाजपची डोकेदुखी वाढली आहे.

### मोहोळमध्ये संजय क्षीरसगार विरुद्ध यशवंत माने फाईट

मोहोळचे विद्यमान आमदार यशवंत माने हे अजित पवार राष्ट्रवादी गटाकडे आहेत. त्यांनाच उमेदवारी देण्याचा आत्ताच निश्चित करण्यात आलं आहे. आता संजय क्षीरसागर हे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटात प्रवेश करताहेत. त्यांना मोहोळ विधानसभेची उमेदवारी या पक्षाकडून देण्याचं ठरलंदेखील आहे. त्यामुळे मोहोळ विधानसभेच्या आखाड्यात आमदार यशवंत माने आणि संजय क्षीरसागर यांच्यात फाईट होऊ शकते. मागील विधानसभा निवडणुकीवेळी क्षीरसागर यांना निर्णायक साधारण ५२ हजार मतं मिळाली होती. शरद पवार यांच्या गटात क्षीरसागर हे प्रवेश करणार असल्यानं या गटाची मोठी ताकद क्षीरसागर यांना मिळणार आहे.

### 'सुराज्य' वृत्तांकनावर विश्वसार्हतेची मोहर

संजय क्षीरसगार यांच्या भूमिकेबद्दल दैनिक 'सुराज्य'नं वृत्तांकन केलं होतं. क्षीरसागर हे भाजप उमेदवाराच्या प्रचारात नाहीत. यशवंत सेनेकडून उमेदवारी जाहीर होऊनदेखील त्यांनी ती नाकारली. क्षीरसागर यांची काहीतरी वेगळी भूमिका आहे का ? याबद्दल १५ एप्रिलच्या अंकात 'संजय आण्णांचा 'कही पे निगाहे, कही ने निशाना' या शीर्षकाखाली वृत्तांकन केलं होतं. शिवाय त्यांचे तालुक्यातील दौरे, समर्थकांचा दबाव लक्षात घेता, क्षीरसागर कोणती तरी वेगळी भूमिका घेतील असा अंदाजही सुराज्यनं आपल्या वृत्तांकनातून व्यक्त केला होता. शेवटी 'सुराज्य' हा अंदाज खरा ठरला. सुराज्यच्या वृत्तांकनावर विश्वासार्हतेची मोहर उमटली.

## राम सातपुते यांना शहर उत्तरमधून जादा मताधिक्य देणार : पाटील

### निवासस्थानी सदिच्छा भेट; निवडणुकीवर चर्चा

सोलापूर/प्रतिनिधी

देशाचा सर्वांगीण विकास पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच करू शकतात. पंतप्रधान नरेंद्र मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी विराजमान करण्यासाठी महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांना शहर उत्तर विधानसभा तसेच प्रभाग क्रमांक तीनमधून सर्वाधिक मताधिक्य देऊ, अशी ग्वाही भाजपाचे ज्येष्ठ नेते तथा महापालिका माजी सभागृह नेते सुरेश पाटील यांनी दिली.

काल सकाळी महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांनी भवानी पेठ, घोंगडे वस्ती परिसरातील सुरेश पाटील यांच्या सदाईश्वर निवासस्थानी जाऊन सदिच्छा भेट घेतली. यावेळी शहराध्यक्ष नरेंद्र काळे, भाजप युवा नेते यतिराज होनमाने आदींचे उपस्थिती होती.

यावेळी माजी सभागृह नेते सुरेश पाटील यांच्या सौभाग्यवती उषा पाटील यांनी राम सातपुते यांचे औक्षण करून आरती ओवाळून स्वागत केले. यावेळी युवा नेते बिपिन पाटील यांनी राम सातपुते यांना शाल फेटा बांधून पुष्पहार घालून सत्कार केला. शहर उत्तर विधानसभा मतदारसंघांमध्ये भाजपा वाढीसाठी सुरेश पाटील यांचे खूप मोठे योगदान आहे. शहर उत्तर मधील भवानी पेठ घोंगडे वस्ती परिसर हा भाजपचा बालेकिल्ला मानला जातो. गेल्या ३० वर्षापासून



आजतागायत सुरेश पाटलांनी भाजपाचा बालेकिल्ला शाबूत ठेवला आहे. अण्णा हे भाजपाचे निष्ठावंत ज्येष्ठ नेते आहेत भाजपा वाढीमध्ये त्यांचे खूप मोठे योगदान आहे. सोलापूर जिल्ह्यातील मतदारांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व हवे आहे. जनतेचा महायुतीला प्रचंड प्रतिसाद आहे त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी विराजमान करण्यासाठी अबकी बार ४०० पारचा संकल्प नरेंद्र मोदींनी केला आहे. यासाठी सुरेश पाटलांची ही भेट घेण्यात आल्याचे यावेळी आमदार राम सातपुते म्हणाले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाने शहर उत्तर विधानसभा मतदारसंघ, शहरातून आमदार राम सातपुते यांना सर्वाधिक मताधिक्य देऊन आपकी बार ४०० पार हे नरेंद्र मोदीची संकल्पना साक्षात आणू अशी ग्वाही भाजपाचे ज्येष्ठ नेते तथा माजी सभागृह नेते सुरेश पाटील यांनी दिली.यादरम्यान उषा सुरेश पाटील, विनायक पाटील,बिपिन पाटील, अक्षय पाटील यांसह पाटील परिवारातील सदस्य उपस्थित होते.

## हत्तरसंग सरपंचपदी लक्ष्मीबाई हालमनी यांची बिनविरोध निवड

**दक्षिण सोलापूर** : हत्तरसंगच्या (ता. दक्षिण सोलापूर) सरपंचपदी लक्ष्मीबाई हालमनी यांची सोमवारी बिनविरोध निवड झाली.

धर्मराव पुजारी यांनी सरपंच पदाचा राजीनामा दिल्याने ही जागा रिक्त झाली होती. यासाठी सोमवारी निवडणूक घेण्यात आली. त्यासाठी ग्रामपंचायतीची विशेष सभा घेण्यात आली. सरपंच पदासाठी लक्ष्मीबाई सिद्राम हालमनी यांचा एकमेव अर्ज दाखल झाला. त्यांच्या अर्जावर सदस्य धर्मराव पुजारी यांनी सूचक म्हणून सही केली. परिणामी निवडणूक निर्णय अधिकारी तथा मंडल अधिकारी एम.एम. काझी यांनी सरपंचपदी लक्ष्मीबाई हालमनी यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले.

याप्रसंगी उपसरपंच बिरप्पा गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य राजशेखर गायकवाड, रेश्मा गायकवाड, अशोक सोनकंटले, श्रीदेवी बिराजदार, निकीता बिराजदार, धर्मराज पुजारी, ग्रामविकास अधिकारी एम.एम.पुजारी, तलाठी सोमशेखर शेड्याळ, पोलीस पाटील शांताबाई गायकवाड, माजी सरपंच जगदेव गायकवाड, सदस्य प्रतिनिधी गुंडप्पा गायकवाड, श्री महालिंगेश्वर तरुण मंडळ, श्री संगम्मा देवी तरुण मंडळ, भीमरत्न तरुण मंडळ व ग्रामस्थ उपस्थित होते.

## सलमान खानच्या घराबाहेर गोळीबाराच्या प्रकरणात दया नायक यांची एंट्री

**मुंबई** : अभिनेता सलमान खानच्या मुंबईतल्या घराबाहेर झालेल्या गोळीबार प्रकरणात दोन आरोपींना पोलिसांनी गुजरातमधून अटक केली आहे. सलमान खानच्या मुंबईतल्या घराबाहेर १४ एप्रिलला गोळीबार झाला होता. दोन अज्ञात व्यक्तींनी सलमान खानच्या घराबाहेर गोळीबार केला. ही घटना घडली तेव्हा सलमान खान आणि त्याचे कुटुंबीय घरातच होते. या प्रकरणाचा तपास आता एन्काऊंटर स्पेशालिस्ट दया नायक करणार आहेत.

मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने सोमवारी गुजरातच्या तापी नदीत शोध मोहीम राबवली. सलमान खानच्या घराबाहेर ज्यांनी गोळीबार केला त्या दोघांना गुजरातमधून अटक करण्यात आली आहे. त्यांनी वापरलेलं पिस्तुल शोधण्यात येतं आहे. विकी गुप्ता, आणि सागर पाल या दोघांना पोलिसांनी अटक केली आहे. या दोघांनी चौकशी दरम्यान हे सांगितलं की त्यांनी पिस्तुल तापी नदीत फेकल्याचं सांगितलं. आता वरिष्ठ पोलीस निरीक्षक दया नायक हेदेखील शोध पथकात आहेत. स्थानिक चालक, मच्छिमार यांच्याकडूनही माहिती घेतली जाते आहे.

मुंबई पोलिसांचं पथक सूरतमध्ये आलं आहे. सलमान खानच्या घराबाहेर जो गोळीबार करण्यात आला ते पिस्तुल शोधण्यासाठी हे पथक आलं आहे. आमची पथकंही त्यांना मदत करत आहेत. अशी माहिती सूरत पोलिस आयुक्त अनुपम सिंग गेहलोत यांनी पीटीआयला दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक दया नायकही या पथकात आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

मत मागताना 'हे'च दाखवायला पाहिजे!

कल्याण
569-03-256
मुंबई
267-55-456

## प्रस्थापित विरुद्ध विस्थापित ही लढाई जनतेची

### माढा मतदार संघातून माझा विजय निश्चित : बारसकर

सोलापूर/प्रतिनिधी

माढा लोकसभा मतदार संघ हा प्रस्थापितांचा मतदारसंघ आहे.या मतदारसंघाचे अनेक मोठं मोठ्या प्रस्थापित नेत्यांनी प्रतिनिधित्व केले आहे.मग ते कोणत्याही राजकीय पक्षातून असू द्या.आजच्या निवडणुकीत एकीकडे विद्यमान खा. रणजितसिंह निंबाळकर आहेत. तर दुसरीकडे धैर्यशील मोहिते-पाटील आहेत.दोन्ही ही घराणे प्रस्थापित आहेत. मात्र मी एक सामान्य कुटुंबातील उच्चशिक्षित विस्थापित तरुण आहे.आणि माझी ही लोकशाहीतील लढाई ही प्रस्थापित विरुध्द विस्थापित आहे.ही लढाई माढा लोकसभेतील विस्थापित तरुणांनी व सामान्य जनतेने हातात घेतली असून, माझा विजय निश्चित आहे. असे प्रतिपादन राज्याचे ओबीसी नेते वंचित बहुजन आघाडीचे माढा लोकसभेचे उमेदवार रमेश बारसकर यांनी केले.

**सांगोला : सांगोला तालुक्यातील वाडेगाव येथील प्रचारात सहभागी झालेले वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार रमेश बारसकर**

रमेश बारसकर हे उमदेवारीचं आपलं चिन्ह घेण्यासाठी सोलापूर येथे आले असताना त्यांनी माध्यमांशी संवाद साधला होता. त्यांनी पुढे सांगितले की, देशाच्या सर्वोच्च सभागृहात विस्थापितांनी जायचेच नाही का ? त्यांच्यासाठी कोणी प्लॅटफॉर्म तयार करून देणार आहे का ? अशी कोणाची वाट पाहून चालणार नाही. निवडणूक ही लढाई आहे. या लढाईत संपूर्ण ताकदीने उतरले पाहिजे. मात्र यासाठी जनतेचा आशीर्वाद मिळणे ही गरजेचे आहे. नाईक-निंबाळकर हे मोठे प्रस्थापित आहेत. आणि मोहिते -पाटील हे सुध्दा मोठे प्रस्थापित आहेत. या दोन्ही उमेदवाराकडे त्यांची स्वतंत्र यंत्रणा आहे.गावागावात त्यांचे कार्यकर्ते हे सुध्दा प्रस्थापित च आहेत. म्हणून आपल्या सारख्या गरीबाच्या पोरांनी ह्या लोकशाही च्या सर्वोच्च उत्साहात सहभागी व्हाचंच नाही का ? असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला.

ते पुढे म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशातील श्रीमंत,गरीब , लहान , मोठा या सर्वांना एक समान अधिकार दिला आहे. तो म्हणजे मतदानाचा अधिकार. आपल्या देशात असे नाही की, पैसेवाल्यांना १० मते, अंबानी, अडाणी या उद्योगपतींना १०० मते आणि आपण गरीब व विस्थापित आहोत, म्हणून एकच मत असे अजिबात नाही. आपल्या देशात सर्वांना एकच मत देण्याचा अधिकार आहे. आणि ह्याच पवित्र मतांच्या माध्यमातून लोकशाहीतील राजा पाच वर्षांसाठी निवडला जातोय. त्यामुळे आत्ता नवयुवकांनी जागृत होऊन मतदान केले पाहिजे.आत्ता सोशल मीडियाच्या जमान्यात जनता जागृत झालेली आहे.त्यांना चांगलं वाईट नक्की काय आहे.हे समजते आहे.

सुराज्य
सोलापूर
१५७/१५८ औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर ४१३००३

पाहिजेत

- मुख्य उपसंपादक : पद १
  - किमान पदवीधर
  - वृत्तपत्रातील कामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव
  - सोलापूर जिल्ह्यातील सामाजिक, राजकीय, आर्थिक ज्ञान
- उपसंपादक : पद २
  - किमान पदवीधर
  - वृत्तपत्रातील कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव
- शहर वार्ताहर : पद ४
  - सोलापूर शहरातील सामाजिक, राजकीय ज्ञान
  - बिटवरील कामाचा किमान २ वर्षाचा अनुभव
- सहाय्यक जाहिरात व्यवस्थापक : पद २
  - किमान पदवीधर
  - वृत्तपत्र जाहिरात विभागातील कामाचा ५ वर्षाचा अनुभव
- मार्केटींग एक्झिक्युटीव्ह (जाहिरात) : पद ३
  - किमान पदवीधर
  - मार्केटींग क्षेत्रातील कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव
  - वृत्तपत्र क्षेत्रातील जाहिरात विभागातील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य
- ऑफीस बॉय : पद ३
  - किमान १० वी उत्तीर्ण

खालील पत्त्यावर ८ दिवसात अर्ज करावेत.
Email : pmitragotri999@gmail.com
Whatsapp No. 8975768348